Reg. No. NP CITY/236/2015-17

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष २, अंक १३(४)] मंगळवार, ऑगस्ट १६, २०१६/श्रावण २५, शके १९३८ [पृष्ठे १५५, किंमत : रुपये ६२.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.), म. शा. रा., अ. क्र. ८५.

जिल्हाधिकारी, यांजकडून

मा. राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र यांचे आदेश क्रमांक रानिआ-मनपा-२००५-प्र.क्र.-१७-का-५, दिनांक ३ मे २००५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १०, पोट-कलम (१) अन्वये यवतमाळ जिल्ह्याचा जिल्हाधिकारी निम्नोक्त आदेशाच्या अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे यवतमाळ नगर परिषद जितक्या प्रभागामध्ये विभागण्यात येईल त्या प्रभागाची संख्या व त्यांची व्याप्ती निश्चित करण्याचे आणि ज्या प्रभागामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गीयांच्या जागा राखून ठेवण्यात येथील ते प्रभाग आणि त्याच प्रमाणे स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्गीय स्त्रियांसह) जागा राखून ठेवण्यात येतील ते प्रभाग दर्शविणारा क्रमांक अ.का-१-नपाप्र-कावि-७५४-२०१६, दिनांक २९-०६-२०१६ च्या आदेशाचा प्रारुप मसूदा महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १०, पोट-कलम (१)च्या परंतुकामध्ये निश्चित केलेल्या पद्धतीप्रमाणे यवतमाळ नगर परिषद क्षेत्रातील रहिवाशांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात आला होता, त्यास अनुसरून आलेल्या हरकतीचा सर्वंकष विचार करून मी, यवतमाळ जिल्ह्याचा जिल्हाधिकारी उक्त अधिनियमाच्या कलम १०, पोट-कलम (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून निम्नोक्त आदेश देत आहे.

आदेश

क्रमांक अ.का.१-नपाप्र-कावि-१६५३-२०१६.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ९, पोट-कलम (२) अन्वये मा. आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन, अमरावती विभाग, अमरावती यांचे आदेश क्रमांक उपआ—नपाप्र-कली-कावि-२९६-२०१६, दिनांक ०९-०८-२०१६ च्या आदेशान्वये त्यांनी यवतमाळ नगर परिषदेच्या बाबतीत अंतिम प्रभाग रचना मंजुर केली व खाली दर्शविल्याप्रमाणे निवडावयाच्या सदस्यांची संख्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या जागा व स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागासवर्ग यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या जागा धरून) राखून ठेवावयाच्या जागा निश्चित केलेल्या आहे.

(१) निवडावयाच्या सदस्यांची संख्या.	. .	. .	५६
(२) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग ह्यांसाठी राखून ठेवावयाच्या जागा	. .	. .	
(अ) अनुसूचित जाती	. .	. .	०९
(ब) अनुसूचित जमाती	. .	. .	०४
(क) नागरिकांचा मागासवर्ग	. .	. .	१५

(३) स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गाच्या स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरून) २८

(४) उपरोक्त क्रमांक (३) पैकी वरील क्रमांक २ (अ), (ब), व (क) येथील जागामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, आणि नागरिकांच्या मागासवर्गाच्या स्त्रियांसाठी राखून ठेवण्याच्या जागांची संख्या खालीलप्रमाणे राहील.

(अ) अनुसूचित जाती ०५

(ब) अनुसूचित जमाती ०२

(क) नागरिकांचा मागासवर्ग ०८

(५) स्त्रियांसाठी सर्वसाधारण जागा म्हणून राखून ठेवावयाच्या जागांची संख्या (अनु. क्र. (३) समोरील नमूद केलेल्या जागा वजा अनु. क्र. (४) समोरील नमूद केलेल्या जागा.) १३

२. त्याअर्थी, आता, मा. राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र यांचे आदेश क्रमांक रानिआ-नप २०१६-प्र.क्र. १०-का-६, दिनांक १५-०६-२०१६ व महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १०, पोट-कलम (१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून मी, यवतमाळ जिल्ह्याचा जिल्हाधिकारी, याद्वारे उक्त नगर परिषद क्षेत्र जितक्या प्रभागात विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व त्याची व्याप्ती या आदेशाच्या अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे निश्चित करीत असून त्या प्रभागामध्ये (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, आणि नागरिकांच्या मागासवर्गाच्या स्त्रियांसह) जागा राखून ठेवण्यात येतील ते प्रभाग निश्चित करीत आहे.

३. या आदेशाच्या तारखेच्या निकट नंतरच्या पुढील सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रयोजनार्थ हा आदेश अंमलात येईल.

अनुसूची

नगर परिषद सार्वत्रीक निवडणूक-२०१६

यवतमाळ प्रभाग निहाय लोकसंख्या, प्रभागाची व्याप्ती व आरक्षण

प्रभाग क्रमांक	प्रभागाचे नाव, असल्यास	प्रभागाची एकूण लोक-संख्या, अनुसूचित जातीची लोकसंख्या, अनुसूचित जमातीची लोकसंख्या	जागा क्र.	प्रभागाची व्याप्ती (उत्तर, पूर्व, दक्षिण, पश्चिम)	आरक्षणाची स्थिती, किती जागा कोणत्या प्रवर्गासाठी जसे अनु. जाती/अनु. जमाती/ नागरिकांच्या मागसवर्ग प्रवर्ग व स्त्रियांसाठी (अनु. जाती/ अनु. जमाती/नागरिकांचा मागासवर्ग स्त्रियांसाठी धरून)
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१		एकूण-९०७२ अ. जा.-२२१६ अ. ज.-२१०४	१-अ १-ब	**स्थळ.–** बांधा खालचा तलाव फैल, धोबी घाट, नारंगे नगर, शासकीय धान्य गोदाम, विदर्भ जीन, मोहा गवाठाण. **उत्तर.–** जुन्या मोहा गावाच्या उत्तर-पूर्व हद्दीपासून पूर्वेकडे मोहा गावाच्या उत्तर-पश्चिम कोप-यापर्यंत. **पूर्व.–** मोहा गावाच्या उत्तर-पश्चिम कोप-यापासून दक्षिणेकडे व नंतर पश्चिमेकडे सर्व्हे नं. ३१ यवतमाळचे उत्तर-पश्चिम कोप-यापर्यंत पुढे सर्व्हे नं. ३१ चे पश्चिम हद्दिने दक्षिणेकडे धोबीघाटापर्यंत. **दक्षिण.–** धोबीघाटापासून उत्तर-पश्चिम दिशेला बंधा-यावरून झेंडा चौकापर्यंत व पुढे धामनगांव रोडला मिळेपर्यंत नंतर उत्तरेकडे धामनगांव रोडने न. प. च्या जुन्या हद्दीपर्यंत तेथून पश्चिमेकडे न.प. जुन्या हद्दीने व मोहा गावच्या दक्षिण हद्दीने न. प. च्या नविन हद्दीला मिळेपर्यंत.	१-अ-अनुसूचित जाती (महिला) १-ब-सर्वसाधारण

अनुसूची—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
				पश्चिम.– यवतमाळ न. प. ची पश्चिम हद्द व जुन्या मोहा गावची दक्षिण हद्द यांचे जंक्शनपासून उत्तरेकडे जुन्या मोहा गावचे पश्चिम हद्दीने मोहा गावच्या जुन्या उत्तर-पश्चिम कोपरा मिळेपर्यंत.	
२		एकूण-८०३७ अ. जा.-४६३० अ. ज.-३९१	२-अ २-ब	**स्थळ.**– तलाव, अंबीकानगर, सुराणा ले-आऊट, डोर्लीपुरा. **उत्तर.**– सर्व्हे नं. ३१ चे पश्चिम कोप-यापासून पूर्वेकडे सर्व्हे नं. ३१ चे उत्तर हद्दीने पुढे जुन्या न. प. हद्दीने पूर्वेकडे सर्व्हे नं. ३१ च्या उत्तर-पूर्व कोप-यापर्यंत. **पूर्व.**– सर्व्हे नं. ३१ च्या उत्तर-पूर्व कोप-यापासून दक्षिणेकडे जुन्या न.प. हद्दीने डोर्ली रोडला मिळेपर्यंत. **दक्षिण.**– जुनी न. प. हद्द व डोर्ली रोड यांच्या जंक्शन पासून पश्चिमेकडे डोर्ली रोडने श्री. शाहू चव्हान यांचे घरासमोरील रस्त्याला मिळेपर्यंत, पुढे दक्षिणेकडे श्री. शाहू चव्हान यांचे घरापर्यंत व नंतर पश्चिमेकडे श्री. चव्हान यांचे उत्तरेकडील रस्त्याने सर्क्युलर रोडला पाटीपुरा येथे मिळेपर्यंत. **पश्चिम.**– डोर्ली रोड कडून येणारा रोड व सर्क्युलर रोड यांच्या जंक्शन पासून उत्तरेकडे सर्क्युलर रोडने नाग मंदीर जवळ पुलापर्यंत पुढे उत्तरेकडे नाल्याने तलावाचे पश्चिम हद्दीस मिळेपर्यंत पुढे तलावाचे पश्चिम हद्दीने उत्तरेकडे बंधा-यापर्यंत, पुढे पूर्वेकडे तलावाच्या बांधाने धोबीघाटपर्यंत पुढे धोबीघाटाला वळसा घालून पुढे उत्तरेकडे सर्व्हे नं. ३१ च्या पश्चिम कोप-यापर्यंत.	२-अ-अनुसूचित जाती (महिला) २-ब-सर्वसाधारण
३		एकूण-८५३२ अ. जा.-५४८ अ. ज.-६७६	३-अ ३-ब	**स्थळ.**– नारिंगी नगर, पिंपळगाव शाळा, पॉलटेकनिक कॉलेज, चोखानी जीन, कॉटन मार्केट, जिजाऊ नगर, छत्रपती नगर, साईनगर, **उत्तर.**– सर्व्हे नं. ५० चे उत्तर-पश्चिम कोप-यापासून जुन्या न.प. हद्दीने पूर्वेकडे व नंतर उत्तरेकडे सर्व्हे नं. ५१ च्या उत्तर-पश्चिम कोप-यापर्यंत पुढे पूर्वेकडे सर्व्हे नं. ५१ च ५२ च्या उत्तर हद्दीने धामनगांव रोडला मिळेपर्यंत. **पूर्व.**– सर्व्हे नं. ५० च्या उत्तर-पूर्व कोप-यापासून दक्षिणेकडे धामनगांव रोडने कॉटन मार्केट दक्षिण-पूर्व कोप-यार्पंत. **दक्षिण.**– कॉटन मार्केटचे दक्षिण-पूर्व कोप-यापासून पश्चिमेकडे व नंतर उत्तरेकडे चोखानी जिनींगच्या दक्षिण हद्दीने पश्चिमेकडे न. प. शाळेजवळून येणा-या रोडला मिळेपर्यंत नंतर दक्षिणेकडे वंजारी फैल प्राथमिक शाळेच्या चौकापर्यंत तेथून पश्चिमेकडे रोडने जिजाऊ कॉलनी जवळील श्री. के. व्ही. पाटील यांचे घरापर्यंत जिजाऊ कॉलनीचे दक्षिण-पश्चिम कोप-यातील श्री. पाटील यांचे घरापासून उत्तरेकडे.	३-अ-ना.मा. प्रवर्ग (महिला) ३-ब-सर्वसाधारण

अनुसूची—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
				पश्चिम.– जिजाऊ कॉलनीचे पश्चिम हद्दीने उत्तरेकडे जुन्या न. प. हद्दीला मिळेपर्यंत नंतर जुन्या न. प. हद्दीने उत्तरेकडे साई नगर पर्यंत पुढे पश्चिमेकडे न. प. हद्दीने पश्चिमेकडे व नंतर उत्तरेकडे पिपळगांव रोड वरील न. प. नाल्यापर्यंत पुढे पुन्हा उत्तरेकडे नाल्याने व नंतर जुन्या न. प. हद्दीने सर्व्हे नं. ५० च्या उत्तर-पश्चिम कोप-यापर्यंत.	
४		एकूण-८३१७ अ. जा.-१४५१ अ. ज.-५५२	४-अ ४-ब	**स्थळ.**– जुने पिंपळगांव ग्रामपंचायत क्षेत्र पूर्ण. **उत्तर.**– सर्व्हे नं. ३७ च्या उत्तर-पश्चिम कोप-यापासून सर्व्हे नं. ३७ च्या उत्तर हद्दीने पूर्वेकडे सर्व्हे नं. ३९, ३८ च्या उत्तर हद्दीने, सर्व्हे नं. ४८ च्या उत्तर-पूर्व कोप-यापर्यंत. **पूर्व.**– सर्व्हे नं. ४८ च्या उत्तर-पूर्व कोप-यापासून दक्षिणेकडे नंतर पश्चिमेकडे नाल्यापर्यंत व नंतर नाल्याने दक्षिणेकडे पिंपळगांव रोडवरील पुलापर्यंत व पुढे दक्षिणेकडे जुन्या नगर परिषदेची हद्द व पिंपळगांवच्या जुन्या हद्दीने सर्व्हे नं. १५ च्या दक्षिण पूर्व कोप-यापर्यंत. **दक्षिण.**– सर्व्हे नं. १५ च्या पिंपळगांवच्या दक्षिण-पूर्व कोप-यापासून पश्चिमेकडे व नंतर उत्तरेकडे व पुन्हा पश्चिमेकडे जुन्या पिंपळगांव ग्रामपंचायतच्या हद्दीने शेत सर्व्हे नं. ३० च्या दक्षिण-पश्चिम कोप-यापर्यंत. **पश्चिम.**– शेत सर्व्हे नं. ३० दक्षिण-पश्चिम कोप-यापासून उत्तरेकडे सर्व्हे नं. ३०, ३५, ३७ च्या पश्चिम हद्दिने शेत सर्व्हे नं. ३७ च्या उत्तर-पूर्व कोप-यापर्यंत.	४-अ-अनुसूचित जाती ४-ब-सर्वसाधारण (महिला)
५		एकूण-८०६३ अ. जा.-१०५८ अ. ज.-३७०	५-अ ५-ब	**स्थळ.**– विलास नगर, प्रियंका नगर, श्री. काशीकर महाराज ले-आऊट, आठवले ले-आऊट, उन्नती पार्क, न्यु आठवले ले-आऊट, स्नेह नगर, गढीकर ले-आऊट, बांगर नगर, जि.प. कॉलनी, शिरभाते ले-आऊट, आदर्श नगर, लोखंडे प्लॉट, अभिनव कॉलनी. **उत्तर.**– वाघापुर सर्व्हे नं. १ चे उत्तर-पश्चिम कोप-यापासून पूर्वेकडून जुन्या वाघापुर ग्रामपंचायतीच्या उत्तर हद्दिने जुन्या यवतमाळ न.प. च्या हद्दिने मिळेपर्यंत पुढे न. प. हद्दिने उत्तरेकडे आदर्श सोसायटीकडून जाणा-या नाल्याला मिळेपर्यंत. **पूर्व.**– न. प. हद्दिपासून आदर्श नगरकडे येणा-या नाल्याने जिजाऊ नगरच्या दक्षिण-पश्चिम कोप-यापासून श्री. पाटील यांचे घरापर्यंत पुढे पूर्वेकडे वंजारी फैलकडे जाणा-या रोडने संदिप टॉकीजच्या मागून येणा-या रोडला मिळेपर्यंत त्यानंतर दक्षिणेकडे रोडने संदिप मंगलमच्या दक्षिणेकडील रोडला मिळेपर्यंत नंतर पूर्वेकडे संदिप मंगलम चौकापर्यंत	५-अ-ना.मा. प्रवर्ग ५-ब-सर्वसाधारण (महिला)

अनुसूची—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
				नंतर दक्षिणेकडे रोडने गिरीनगरच्या नाल्यापर्यंत नंतर नाल्याने पश्चिमेकडे व नंतर दक्षिणेकडे गिरीनगरच्या हद्दिने श्री. बिन्नोड यांचे घराजवळील गल्लीपर्यंत तेथून पूर्वेकडे व नंतर उत्तरेकडे श्री. राऊत यांचे घरापर्यंत नंतर गल्लीने गिरीनगर ते संदिप मंगलम रोडला मिळेपर्यंत नंतर दक्षिणेकडे वाघापुर रोडला श्री. आसरकर यांचे घराचे कोप-याला मिळेपर्यंत.	
				दक्षिण.— श्री. आसरकर यांचे घराचे कोप-यापासून पश्चिमेकडे वाघापुर रोडने वाघापुर नाक्यापर्यंत पुढे पश्चिमेकडे वाघापुर रिंगरोडने हनुमान मंदिरापासून पुढे पश्चिमेकडे यवतमाळ बोदड रोडवरील जुना लोहारा ग्रामपंचायतीच्या हद्दिपर्यंत.	
				पश्चिम.— वाघापुर नाका ते बोदडकडे येणा-या रस्ता व जुन्या लोहारा ग्रामपंचायतीची हद्द यांचे जंक्श्नपासून उत्तरेकडे सर्व्हे नं. १ चे उत्तर-पश्चिम कोप-यापर्यंत.	
६		एकूण-८१७८ अ. जा.-५७५ अ. ज.-४६३	६-अ ६-ब	**स्थळ.**— टिंबरभवन, राजेंद्र नगर, खोजा मसजित.शिवाजी शाळा, गिरी नगरचा भाग, गाडगे नगर.	६-अ-ना. मा. प्रवर्ग (महिला) ६-ब-सर्वसाधारण
				उत्तर.— संदिप टॉकीजच्या मागून येणारा रोड व वंजारी फैल चौक येथून येणारा रोड यांचे जंक्शन पासून पूर्वेकडे वंजारी फैल चौकापर्यंत नंतर उत्तरेकडे चोखानी जिनिंगचे दक्षिणेकडील रस्त्याला मिळेपर्यंत नंतर पूर्वेकडे कॉटन मार्केटच्या, पश्चिमेकडील रस्त्यास मिळेपर्यंत. नंतर दक्षिणेकडे कॉटन मार्केटचे पश्चिम व दक्षिण हद्दीने धामनगांव रोडला मिळेपर्यंत.	
				पूर्व.— कॉटन मार्केटच्या दक्षिण पूर्व कोप-यापासून धामनगांव रोडने दक्षिणेकडे स्टेट बँक चौकापर्यंत.	
				दक्षिण.— स्टेट बँक चौकापासून वाघापुर रोडने संदिप टॉकीज कडे जाणा-या रस्त्यापर्यंत.	
				पश्चिम.— वाघापुर रोड पासून संदिप टॉकीजकडे जाणा-या रोडने गिरीनगर मधिल पश्चिमकडे जाणा-या गल्लीला मिळेपर्यंत नंतर दक्षिणेकडे नंतर पश्चिमेकडे व उत्तरेकडे गिरीनगरच्या हद्दिने व पूर्वेकडे गिरीनगरच्या हद्दीने पुन्हा संदिप मंगलमच्या रस्त्याला मिळेपर्यंत पुढे उत्तरेकडे संदिप मंगलम चौकापर्यंत नंतर पश्चिमेकडे संदिप मंगलमचे मागे रस्त्यास मिळेपर्यंत नंतर उत्तरेकडे संदिप मंगलमच्या मागील रस्त्याने वंजारी फैल चौकाकडे जाणा-या रस्त्यास मिळेपर्यंत.	
७		एकूण-८७६८ अ. जा.-७७९ अ. ज.-११२८	७-अ ७-ब	**स्थळ.**— गोदाम फैल, गांधी नगर, पावर हाऊस, नेहरु नगर, मायादेवी भालचंद्र कंम्पाऊंड.	७-अ-अनुसूचित जमाती (महिला) ७-ब-सर्वसाधारण
				उत्तर.— धामनगांव रोडवरील निशिगंधा लॉनचे उत्तर-पश्चिम कोप-यापासून रोडने पूर्वेकडे झेंडा चौक व पुढे बंधा-यापर्यंत	

अनुसूची—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
				पूर्व.— तलावाच्या बंधा-यापासून तलावाचे पश्चिम हद्दिने दक्षिणेकडे नाल्यापर्यंत व पुढे नाल्याने लोखंडीपुलापर्यंत व पुढे पश्चिमेकडे नाल्याने अप्सरा जवळील पुलाला मिळेपर्यंत. **दक्षिण**— अप्सरा टॉकीज जवळील पुलापासून पश्चिमेकडे सर्क्युलर रोडने स्टेट बँक चौकापर्यंत. **पश्चिम.**— स्टेट बँक चौकापासून उत्तरेकडे धामनगाव रोडने निशिगंधा लॉन जवळील तलावाकडे जाणा-या रोडला निशिगंधा लॉनचे उत्तर-पश्चिम कोप-या-जवळ मिळेपर्यंत.	
८		एकूण-९१६६ अ. जा.-५४२७ अ. ज.-२००	८-अ ८-ब	**स्थळ.**— रवीदास नगर, आंबेडकर नगर, दलीत सोसायटी, पाटीपुरा, सेवा नगर शाळा, सेवा नगर, संडास कॉम्प्लेक्स. **उत्तर.**— नागमंदिरापासून सर्क्युलर रोडने दक्षिण पश्चिमेकडे पाटीपुरा येथे श्री. शाहु चव्हान यांचे घराकडून येणा-या रस्त्यास मिळेपर्यंत पुढे पश्चिमेकडे रोडने श्री. शाहु चव्हान यांचे घरापर्यंत तेथून उत्तरेकडे रोडने डोर्लीपुरा रोडला मिळेपर्यंत तेथून पूर्वेकडे डोर्ली रोडने जुन्या न. प. हद्दिपर्यंत. **पूर्व.**— आंबेडकर नगरच्या उत्तर-पूर्व कोप-यापासून आंबेडकर नगरच्या पूर्व हद्दिने व आंबेडकर नगरच्या दक्षिण-पूर्व कोप-यापर्यंत पुढे पश्चिमेकडे आर. टी. ओ. ऑफीसच्या मागील कंम्पाऊंड वॉलने श्री. मोहम्मद युसूफ अब्दुल रसीद यांचे घरापर्यंत पुढे उत्तरेकडे श्री. युसूफखान यांचे घरापर्यंत पुढे दक्षिण-पश्चिम दिशेने महमुदा अर्बास यांचे घरापर्यंत पुढे पश्चिमेकडे श्री. अशोक तांबे यांचे घरापर्यंत पुढे दक्षिणेकडे यवतमाळ-कळंब रोडवरील सेवानगर सार्वजनिक सुलभ शौचालय-पर्यंत. **दक्षिण.**— जुन्या न. प. हद्दिपासून कळंब रोडने पश्चिमेकडे सेवा नगर शाळेपर्यंत नंतर सेवा नगर शाळेच्या पश्चिम भिंतीने श्री. चंदन तेलंग यांचे घराकडून येणा-या रस्त्यास मिळेपर्यंत नंतर पूर्वेकडे श्री. तेलंग यांचे घरापर्यंत नंतर पुढे उत्तरेकडे आंबेडकर चौकापर्यंत नंतर पश्चिमेकडे बालाजी मंदिर रोडने मातीखाया पुलापर्यंत. **पश्चिम.**— मातीखाया पुलापासून नाल्याने उत्तरेकडे सर्क्युलर रोडवरील नाग मंदिरपर्यंत.	८-अ-अनुसूचित जाती (महिला) ८-ब-सर्वसाधारण
९		एकूण-९६७१ अ. जा.-९१ अ. ज.-१४३	९-अ ९-ब	**स्थळ.**— सिद्धेश्वर नगर, फैज नगर, चमेडीया ले-आऊट. **उत्तर.**— मातीखाया पुलापासून पूर्वेकडे आंबेडकर चौकापर्यंत तेथून दक्षिणेकडे कळंब चौकाकडे जाणा-या रोडने श्री. चंदन तेलंग यांचे घरापर्यंत पुढे न. प. च्या सेवा नगर भिंतीपर्यंत पुढे भिंतीने दक्षिणेकडे कळंब रोड मिळेपर्यंत पुढे कळंब रोडने पूर्वेकडे सेवा	९-अ-ना. मा. प्रवर्ग (महिला) ९-ब-सर्वसाधारण

अनुसूची—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
				नगर सार्वजनिक शौचालयापर्यंत तेथून उत्तरेकडे श्री. अशोक तांबे यांच्या घरापर्यंत तेथून पूर्वेकडे अंजुमन उर्दु हायस्कुलच्या मागील बाजूने श्री. मोहम्मद अली यांच्या घरापर्यंत तेथून उत्तर-पूर्व कोप-यात श्री. युसूफ खान यांच्या घरापर्यंत तेथून दक्षिणेकडे श्री. मोहम्मद युसूफ अ. रसीद यांच्या घरापर्यंत तेथून पूर्वेकडे जुन्या न. प. हद्दीला मिळेपर्यंत तेथून उत्तरेकडे जुन्या न. प. हद्दीने डोर्लीरोडला मिळेपर्यंत तेथून पूर्वेकडे डोर्लीरोडने, डोर्लीवरील श्री. मुस्ताक देशमुख यांच्या घरापर्यंत.	
				पूर्व.— पाटीपुरा ते डोर्लीकडे जाणा-या रस्त्याचे दक्षिणेकडील श्री. मुस्ताक देशमुख यांचे घराजवळून दक्षिणेकडे श्री. मलनस कमरूद्दीन यांचे घरापासून श्री. शेख निसार शे. युनूस यांचे घरापासून दक्षिणेकडे न.प. कंम्पोस्ट डेपोच्या दक्षिण हद्दीपर्यंत पुढे पूर्वेकडे श्री. वलीनुर जमादार यांचे घरापर्यंत तेथून दक्षिणेकडे श्री. चिंतामन मरापे ते एम. बी. खान शाळेच्या पश्चिम-दक्षिण कोप-यापासून नाल्याने पूर्वेकडे श्री. पंधरे गुरूजी यांचे घरामागून नाल्याने दक्षिणेकडे बीएसएनएल टॉवरच्या मागील बाजूने यवतमाळ-पांढरकवडा रोडपर्यंत.	
				दक्षिण.— पांढरकवडा रोडवरील बीएसएनएल टॉवरच्या नाल्याजवळून पश्चिमेकडे वणी-दारव्हा रोडने रहेमान डेकोरेशनच्या कॉम्प्लेक्सपर्यंत.	
				पश्चिम.— वणीरोडवरील रहेमान कॉम्प्लेक्सपासून उत्तरेकडे गल्लीने साकी वाईन बारपर्यंत नंतर पूर्वेकडे इस्लाम पुरा मज्जीत समोरील रोडला मिळेपर्यंत नंतर उत्तरेचे लकी ड्रायव्हींग स्कूल जवळील येणा-या रोडला मिळेपर्यंत नंतर पश्चिमेकडे लकी ड्रायव्हींग स्कूलपर्यंत पुढे उत्तरेकडे रोडने छोटी गुजरीपर्यंत पुढे मदीना मज्जीत समोरील रोडने मातीखाया पुलापर्यंत.	
१०		एकूण-९५७८ अ. जा.-४२८ अ. ज.-२६७	१०-अ १०-ब	**स्थळ.**— जाफर नगर, इंदिरा नगर, डोळंबा, गुलशन नगर, कोहिनूर सोसायटी, अल्मास नगर, बीलाल नगर.	१०-अ-ना. मा. प्रवर्ग खुला १०-ब-सर्वसाधारण महिला
				उत्तर.— डोर्ली रोड वरील श्री. मुस्ताक देशमुख यांचे घरापासून डोर्लीरोडने पूर्वेकडे श्री. साजीद भाई यांचे घरासमोरुन पुढे मौजा डोर्लीचे शिवचे न. प. हद्दीपर्यंत.	
				पूर्व.— मौजा डोर्ली शिव व न. प. हद्दीने जंक्शनपासून दक्षिणेकडे श्री. केदारनाथ नागरगोजे यांचे शेताच्या हद्दीने श्री. काजी अहमद शेख यांचे घरापर्यंत तेथून पूर्वेकडे श्री. जमील शेख यांचे घरापर्यंत तेथून दक्षिणेकडे कळंब रोड मिळेपर्यंत तेथून पूर्वेकडे नागपूर रोडने बायपासपर्यंत तेथून डोर्ली हद्दीने उत्तर बाजूच्या उत्तर-पूर्व न.प. हद्दी पर्यंत.	

अनुसूची—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
				दक्षिण.— डोळंबाच्या हद्दीने पश्चिमेकडे नागपूर-पांढरकवडा रोडच्या जंक्शन जवळील श्री. जावेद यांच्या वर्क्स शॉपपर्यंत तेथून पश्चिमेकडे पांढरकवडा रोडने, तेथून पारवेकर शाळेच्या बस स्टॉपपर्यंत तेथून पारवेकर कॉलेजपर्यंत तेथून पारवेकर कॉलेजच्या दक्षिण बाजूच्या कंम्पांऊड वॉलने पावर हाऊसच्या पश्चिमेकडे वॉलकंम्पाऊंडने दक्षिणेकडून पश्चिमेकडे पावर हाऊसच्या वॉल कंम्पाऊंडने पश्चिमेकडे पुन्हा उत्तरेकडे कंम्पाऊंड वॉलने पश्चिमेकडे जफर नगरच्या शाळेच्या रस्त्यापर्यंत शाळेपासून दक्षिणेकडे श्री. अब्दुल जलील यांचे घरापर्यंत दक्षिण-पश्चिम रस्त्याने श्री. अन्सारी यांचे घरापर्यंत तेथून पश्चिमेकडे श्री. नसीम खाँन यांचे घरापर्यंत तेथून दक्षिणेकडे श्री. शेख जावेद यांचे घरामागून शेताच्या धु-याधु-याने श्री. शरीफ खाँन यांचे घरापर्यंत तेथून श्री. जुनेखान यांचे घरासमोरून पश्चिमेकडे मदरसापर्यंत तेथून श्री. खाँन यांचे घरासमोरून भोसा रोडवरील चांदसी दवाखान्यापर्यंत.	
				पश्चिम.— चांदसी दवाखान्यापासून उत्तरेकडे परदेशी दुर्गादेवी जवळून फ्रुट मंडीतील मॉर्डन कवेलू भंडार ते वणी रोडला मिळेपर्यंत.	
११		एकूण-८२३७ अ. जा.-३२२ अ. ज.-३६१	११-अ ११-ब	**स्थळ.**— हनुमान आखाडा, माळीपुरा, वाणी पुरा, मेन लाईन, चमेडीया नगर, नगर परिषद कार्यालय, छोटी गुजरी, बिडीपत्ता चौक, सावकार पेठ, मेन लाईन.	११-अ-ना. मा. प्रवर्ग खुला ११-ब-सर्वसाधारण महिला
				उत्तर.— अप्सरा टॉकीज जवळील नाल्याने व भारत सेवा उत्तर-पूर्वेकडे लोखंडीपुलापर्यंत व पुढे नाल्याने भारत सेवा आखाड्यासमोर तलावाला मिळेपर्यंत.	
				पूर्व.— भारत सेवा आखाड्या जवळील नाल्याने दक्षिणेकडे सर्कुलर रोडवर नागमंदिराला मिळेपर्यंत पुढे नाल्याने मातीखाया पुलापर्यंत त्यानंतर मदिना मस्जिद समोरून छोटी गुजरी चौकापर्यंत पुढे बिडीपत्ता चौक व लकी ड्रायव्हिंग स्कूलचे समोरील रस्त्यास मिळेपर्यंत नंतर उत्तरेकडे ईस्लामपु-यातील मस्जिद समोरील रोडला मिळेपर्यंत नंतर दक्षिणेकडे मस्जिद समोरील रोडने श्री. मोहनलाल जयस्वाल यांचे घराचे उत्तरेकडील रोडला मिळेपर्यंत तेथून पश्चिमेकडे साकी वाईन बारपर्यंत नंतर दक्षिणेकडे रेहमान डेकोरेशन कॉम्प्लेक्स जवळ वणीरोडला मिळेपर्यंत.	
				दक्षिण.— रहिमान डेकोरेशन कॉम्प्लेक्स जवळून वणी रोडने पश्चिमेकडे पोलीस स्टेशनपर्यंत.	
				पश्चिम.— वणी रोडवरील पोलीस स्टेशनपासून उत्तरेकडे वीर सावरकर रोडने हनुमान आखाड्यापर्यंत पुढे पश्चिमेकडे रोडने नाल्यापर्यंत नंतर नाल्याने	

अनुसूची—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
				उत्तरेकडे अप्सरा टॉकीज जवळील रस्त्यास मिळेपर्यंत.	
१२		एकूण-९३४४ अ. जा.-१०३८ अ. ज.-८२०	१२-अ १२-ब	**स्थळ.**— अग्रवाल ले-आऊट, सेमेनरी ले-आऊट(महेश नगरी), सिव्हील लाईन, इंदिरा गांधी मार्केट, पेशवे प्लॉट, महादेव मंदिर, जोशी वाडा, जैल बगीचा, पोलीस कॉर्टर, जिल्हाधिकारी कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जुना वाघापूर गावठाण भाग, नवरंग पेपर मिल, नवरंग नगर, महावीर नगर, गुरूवाणी सोसायटी, सहयोग नगर. **उत्तर.**— जुन्या वाघापूर ग्रामपंचायतीच्या चौसाळारोडवरील काशीकर महाराज समाधीपासून रोडने पूर्वेकडे वाघापूर नाक्यापर्यंत पुढे सर्क्युलर रोडने पूर्वेकडे अप्सरा टॉकीज जवळील पुलापर्यंत. **पूर्व.**— अप्सरा टॉकीज जवळील पुलापासून नाल्याने दक्षिणेकडे हनुमान आखाडा जवळील पुलापर्यंत पुढे पूर्वेकडे हनुमान आखाडा चौकापर्यंत नंतर सावरकर मार्गाने दक्षिणेकडे पोलीस स्टेशन जवळ दारव्हा रोडने मिळेपर्यंत. **दक्षिण.**— पोलीस स्टेशन पासून दारव्हा मार्गाने सिमेंट रोडने लाठीवाला पेट्रोल पंपापर्यंत. **पश्चिम.**— लाठीवाला पेट्रोल पंप जवळील दारव्हा रोडने उत्तरेकडे नंदुरकर शाळेच्या मागे श्री. बायस्कर यांचे घरापर्यंत पश्चिमेकडे झुलेलाल अपार्टमेंट-पर्यंत तेथून उत्तरेकडे श्री. प्रकाश डांगे यांचे घरापर्यंत तेथून रोडने पश्चिमेकडे श्री. कोळेकर यांचे घरापर्यंत तेथून उत्तरेकडे रस्त्याने श्री. सुचक यांचे घरापर्यंत नंतर रस्त्याने पश्चिमेकडे महावीर शाळेच्या पश्चिम कोप-यापर्यंत तेथून उत्तरेकडे श्री. कोल्हारकर यांचे घरापर्यंत तेथून पश्चिमेकडे शिवाजी चौकातून उत्तर-पूर्व रस्त्याने वाघापूर जि.प. शाळेपर्यंत तेथून पश्चिमेकडे श्री. अनिल पांडे यांचे घरापासून वाघापूर टेकडीच्या उत्तर-पश्चिम रस्त्याने श्री. काशीकर महाराज समाधी स्थळाच्या उत्तर-पूर्व कोप-यापर्यंत.	१२-अ-अनुसूचित जमाती महिला १२-ब-सर्वसाधारण खुला
१३		एकूण-९१६४ अ. जा.-२३७६ अ. ज.-१३३६	१३-अ १३-ब	**स्थळ.**— नंदनवन सोसायटी, आठवले ले-आऊट, साई शाळा, मडावी ले-आऊट, साने गुरुजी नगर, मामा ले-आऊट, सिद्धेश्वर नगर, काशीकर महाराज नगरी, वैभव नगर, चिंतामणी नगर, शिवम कॉलनी, देवांगन सोसायटी. **उत्तर.**— न. प. हद्दीपासून पूर्वेकडे रेणुका नगर विटभट्टी व बी.एड. कॉलेजच्या मागील बाजूने श्री. भिमराव बर्डे यांचे घरापर्यंत. **पूर्व.**— श्री. भिमराव बर्डे यांचे घरापासून दक्षिणेकडे काशीकर महाराज समाधी स्थळाच्या उत्तर-पूर्व कोप-यापासून रस्त्याने वाघापूर टेकडीच्या	१३-अ-अनुसूचित जाती महिला १३-ब-सर्वसाधारण खुला

अनुसूची—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
				उत्तर-पश्चिम रस्त्याने श्री. अनिल पांडे यांचे घरापासून पूर्वेकडे जि. प. शाळेपर्यंत तेथून पश्चिम-दक्षिण कोप-यात शिवाजी चौकापर्यंत तेथून पूर्वेकडे श्री. कोलारकर यांचे घरापासून दक्षिणेकडे महावीर शाळेपासून श्री. परांडे यांचे घरापर्यंत व तेथून पश्चिमेकडील संत गाडगे बाबा चौकापर्यंत तेथून दक्षिणेकडे खुल्या जागेवरील रेणुका माता मंदिरापर्यंत. **दक्षिण.**— रेणुका माता मंदिरापासून पश्चिमेकडे रेल्वे लाईनने प्रजापती लॉनच्या मागील बाजूने श्री. रघुनाथ गायकी यांचे घरापर्यंत. **पश्चिम.**— श्री. रघुनाथ गायकी यांचे घरापासून उत्तरेकडे श्री. मधुकर अढाव यांचे घरापर्यंत तेथून पश्चिमेकडे श्री. दिपक मोहन कांबळे यांचे घरापर्यंत तेथून उत्तर-पश्चिम रस्त्याने न. प. हद्दीपर्यंत.	
१४		एकूण-८३०७ अ. जा.-२४१३ अ. ज.-१८०२	१४-अ १४-ब	**स्थळ.**— रेवती हॉटेल, झुलेलाल प्राईड, महावीर नगर भाग-१, महावीर नगर भाग-२, वर्धमान नगर, राऊत नगर, मैथीली नगर भाग-१, मैथीली नगर भाग-२, अहिल्या नगरी, साठवणे ले-आऊट, अश्विन टॉवर, यादव ले-आऊट, वसंत सोसायटी, जि. प. शाळा, जुने गावठाण. **उत्तर.**— दारव्हा रोडच्या रेल्वे जंक्शनपासून पश्चिमेकडे रेणुका मंदीराच्या खुल्या जागेपासून प्रजापती लॉनच्या मागील बाजूने श्री. रघुनाथ गायकी यांचे घरापर्यंत तेथून उत्तरेकडे श्री. मधुकर अढाऊ यांचे घरापर्यंत तेथून पश्चिमेकडे श्री. दिपक कांबळे यांचे घरापर्यंत तेथून उत्तर-पश्चिम कोप-यात न. प. हद्दीपर्यंत. **पूर्व.**— निरंक **दक्षिण.**— दारव्हा रोड रेल्वे जंक्शनपासून पश्चिमेकडे दारव्हा रोडने लोहारा चौक श्री. शिवाजी महाराज यांचे पुतळ्यापर्यंत व तेथून नवदुर्गा मंदिराच्या मागील बाजूस नाल्यापर्यंत. **पश्चिम.**— नवदुर्गा मंदिराच्या मागील बाजूच्या नाल्याने श्री. प्रदिप खोब्रागडे यांचे घरापर्यंत तेथून उत्तरेकडे श्री. मुन्ना दर्डा ते श्री. नागेश नरवाडे यांचे घरापर्यंत तेथून श्री. प्रदिप कांबळे यांचे घरापर्यंत तेथून पूर्व-उत्तर कोप-यात श्री. भिमराव भगत यांचे घरापर्यंत तेथून पश्चिम-उत्तर कोप-याने श्री. शंकर पुरी यांचे घरामागून उत्तरेकडे जवाहरलाल दर्डा वसति गृहाच्या कंम्पाऊंड वॉलने श्री. उमेश खटारे यांचे घरापर्यंत तेथून पश्चिमेकडे जवाहर दर्डा वसतिगृहाच्या उत्तर-पूर्व कोप-यापासून जवाहरलाल इंजिनीअरींग कॉलेजच्या उत्तर बाजूने न. प. हद्दीपर्यंत.	१४-अ-अनुसूचित जाती खुला १४-ब-सर्वसाधारण

अनुसूची—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१५		एकूण-९०३१ अ. जा.-३१९९ अ. ज.-६४५	१५-अ १५-ब	**स्थळ.**— नेताजी नगर, वैशाली सोसायटी, चंद्रमणी सोसायटी, सिद्धार्थ सोसायटी, माधव नगर, रंभाजी नगर, करीम नगर, पटवारी सोसायटी, रुग्णालय सोसायटी, आ. पी. देशमुख ले-आऊट, सहकारी बँक सोसायटी, शासकीय सेवा सोसायटी, गजानन नगरी, रेणुका नगरी, श्रेयस नगरी. **उत्तर.**— संत गाडगे बाबा चौकापासून पूर्वेकडे श्री. परांडे यांचे घरापासून उत्तरेकडे महावीर शाळेपर्यंत पुढे पूर्वेकडे सूचक यांचे घरापर्यंत. **पूर्व.**— श्री. सूचक यांचे घरापासून दक्षिणेकडे श्री. सुधाकर कोठेकर यांचे घरापर्यंत नंतर पूर्वेकडे श्री. प्रकाश डांगे यांचे घरापर्यंत तेथून दक्षिणेकडे झुलेलाल अपार्टमेंटपर्यंत तेथून पूर्वेकडे श्री बायस्कर यांचे घरापर्यंत तेथून नंदुरकर विद्यालयाचे मागील बाजूने दक्षिणेकडे दारव्हा रोडला लाठीवाला पेट्रोल पंपाजवळ. **दक्षिण.**— लाठीवाला पेट्रोल पंपाजवळून दारव्हा रोडने पश्चिमेकडे रेल्वे फाटकापर्यंत तेथून उत्तरेकडे रेणुका नगरी मधील खुल्या मैदानापर्यंत. **पश्चिम.**— रेणुका नगरी मधील खुल्या मैदानापासून उत्तरेकडे संत गाडगे बाबा चौकापर्यंत.	१५-अ-अनुसूचित जाती महिला १५-ब-सर्वसाधारण खुला
१६		एकूण-९५२७ अ. जा.-६८४ अ. ज.-६७५	१६-अ १६-ब	**स्थळ.**— राधिका नगरी, सिंघानिया नगर, ठाकूर प्लॉट, जिरापुरे प्लॉट, एम.एस.इ.बी. कार्यालय, मानवता मंदिर, शिवनेरी सोसायटी, क्रिटीकेअर दवाखाना, जि. प. कार्यालय, पत्रकार कॉलनी, अंबानगरी, मातोश्री मंगल कार्यालय, लाठीवाला पेट्रोल पंप, रेल्वे स्टेशन कंम्पाऊंड. **उत्तर.**— दर्डा गार्डनपासून दारव्हा रोडने पूर्वेकडे बस स्थानक चौकापर्यंत. **पूर्व.**— बस स्टँड चौकापासून दक्षिणेकडे रोडने आमराई पु-याच्या पश्चिमेकडील रोडने श्री. भामकर पाटील यांचे घरापर्यंत तेथून शिवाजी उद्यानाचे उत्तर-पूर्व कोप-यापर्यंत तेथून पुराणिक हॉस्पीटल समोरून आर्णी रोडला मिळेपर्यंत तेथून आर्णी रोडने शांतीनाथ ट्रेडर्सपर्यंत. **दक्षिण.**— आर्णीरोडवरील शांतीनाथ ट्रेडर्सपासून पश्चिमेकडे श्री. गाडगे यांचे घरामागील नाल्यापर्यंत, नाल्याने दक्षिण-पश्चिम कोप-याजवळील श्री. भगत यांचे घरामागील नाल्याने श्री. शिरसाट यांचे घरापर्यंत, श्री. शिरसाट यांचे घरापासून उत्तरेकडे श्री. विष्णु काटकर यांचे घरापर्यंत तेथून पश्चिमेकडे हनुमान मंदिराच्या रस्त्याने तेजस्विनी होस्टेलपर्यंत तेथून उत्तरेकडे श्री. भुरे यांचे घरापर्यंत तेथून पश्चिमेकडे मनोहर प्रोव्हीजनपर्यंत.	१६-अ-ना. मा. प्रवर्ग महिला १६-ब-सर्वसाधारण खुला

अनुसूची—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
				पश्चिम.— मनोहर प्रोव्हीजनपासून उत्तरेकडे रोडने दर्डा गार्डन जवळ दारव्हा रोडला मिळेपर्यंत.	
१७		एकूण-९११५ अ. जा.-२९२ अ. ज.-४०७	१७-अ १७-ब	**स्थळ.**— बस स्थानक, दत्त चौक, आमराईपुरा, शिवाजी नगर, दाते कॉलेज, ऐरीगेशन कॉलनी, समर्थवाडी भाग. **उत्तर.**— बस स्थानक चौकापासून पूर्वेकडे सिमेंट रोडने नेताजी चौकापर्यंत. **पूर्व.**— नेताजी चौकापासून दक्षिणेकडे दत्त चौक व पुढे श्रोत्री हॉस्पीटलपर्यंत नंतर पूर्वेकडे सारस्वत चौकापर्यंत, नंतर दक्षिणेकडे संकट मोचन रोडने न. प. साने गुरूजी शाळेजवळील श्री. पाटील यांचे घरापर्यंत नंतर पूर्वेकडे शासकीय अध्यापक विद्यालयाचे हद्दीपर्यंत नंतर दक्षिणेकडे शासकीय अध्यापक विद्यालयाचे हद्दीने संकट मोचन जवळ न.प. च्या जुन्या हद्दीपर्यंत. **दक्षिण.**— संकट मोचन जवळील शासकीय अध्यापक विद्यालयाच्या होस्टेलच्या दक्षिण-पश्चिम कोप-यापासून श्री. कोपुलवार यांचे घरापर्यंत तेथून पश्चिमेकडे श्री. इंगोले यांचे घरापर्यंत तेथून दक्षिणेकडे श्री. दाभेरे यांचे घरापर्यंत तेथून पश्चिमेकडे महालक्ष्मी अपार्टमेंटपर्यंत तेथून दक्षिणेकडे प्रियदर्शनी अपार्टमेंटच्या उत्तर बाजूने पश्चिमेकडे साईप्रसाद अपार्टमेंट विंग नं. ३ च्या उत्तर-पश्चिम कोप-याजवळ श्री. विठ्ठलराव शिरभाते यांचे घरापर्यंत तेथून दक्षिणेकडे बी. एड. कॉलेजच्या कंम्पाऊंड वॉलने पश्चिमेकडे गणपती मंदिराच्या मागील बाजूने पश्चिमेकडे श्री. चंद्रकांत हांडे यांच्या घराच्या उत्तर बाजूपर्यंत. **पश्चिम.**— श्री. हांडे यांचे घरापासून उत्तरेकडे श्री. फडणीस यांचे घरापर्यंत तेथून पूर्वेकडे भरणे कॉम्प्लेक्स पर्यंत तेथून उत्तरेकडे गाबडा फिटनेस सेंटरपासून उत्तरेकडे हॉटेल माई आर्णी रोडपर्यंत तेथून पूर्वेकडे आयुर्वेदिक कॉलेजपर्यंत दक्षिणेकडे श्री. डॉ. पुराणिक यांचे दवाखान्याच्या दक्षिण कोप-यापर्यंत तेथून रोडने श्री. भामकर पाटील यांचे घरापर्यंत तेथून उत्तरेकडे आमराईपु-यातून श्री. सोळंकी यांचे घरापासून बस स्थानक चौकापर्यंत.	१७-अ-ना. मा. प्रवर्ग महिला १७-ब-सर्वसाधारण खुला
१८		एकूण-९७७७ अ. जा.-९०१ अ. ज.-३६५	१८-अ १८-ब	**स्थळ.**— जिल्हा कारागृह, अवधुतवाडी, टिळकवाडी, विदर्भ हाऊसिंग कॉलनी, हिंदी हायस्कूल, बी.एड. कॉलेज, बाजोरीया नगर, चापनवाडीचा भाग, टि.बी.हॉस्पीटल परिसर, साने गुरुजी शाळा. **उत्तर.**— नेताजी चौकापासून वणी रोडने तहसील चौकापर्यंत. **पूर्व.**— तहसील चौकापासून दक्षिणेकडे गोदनी रोडनी	१८-अ-ना.मा. प्रवर्ग खुला १८-ब-सर्वसाधारण महिला

अनुसूची—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
				उपविभागीय अधिकारी यांचे बंगल्या समोरील रस्त्याला मिळेपर्यंत नंतर पूर्वेकडे हरनामसिंग चाळी पर्यंत दक्षिणेकडे हनुमान मंदिरा पर्यंत तेथून पूर्वेकडे मिलिंद सोसायटीच्या पश्चिम हद्दीपर्यंत, मिलिंद सोसायटीच्या पश्चिम हद्दीने श्री. शंकरलाल चमेडीया यांचे घरासमोरील रोडला मिळेपर्यंत नंतर पश्चिमेकडे श्री. भास्करराव यांचे घरापर्यंत नंतर दक्षिणेकडे रोडने श्री. अतुल पांडे यांचे घरापर्यंत नंतर पूर्वेकडे विदर्भ हाऊसिंग कॉलनी जवळ न. प. च्या जुन्या हद्दीपर्यंत पुढे दक्षिणेकडे जुन्या न. प. हद्दीने विदर्भ हाऊसिंग कॉलनीच्या दक्षिण पूर्व कोप-यापर्यंत पुढे पश्चिमेकडे न. प. हद्दीने गोधनी रोडला मिळेपर्यंत नंतर गोदनी रोडने शासकीय तांत्रिक विद्यालयाचे उत्तर-पूर्व कोप-यापर्यंत.	
				दक्षिण.— गोधनी रोड पासून तंत्रविद्यालयाचे उत्तर हद्दीने पश्चिमकडे शासकीय अध्यापक विद्यालयाच्या होस्टेलचे दक्षिण-पश्चिम कोप-या जवळ नं. प. च्या जुन्या हद्दीने शासकीय तंत्र विद्यालयाचे दक्षिण-पश्चिम कोप-यापर्यंत.	
				पश्चिम.— शासकीय अध्यापक विद्यालयाचे होस्टेलचे दक्षिण-पश्चिम कोप-यापासून उत्तरेकडे कंम्पाऊंडने श्री. पाटील यांचे घराजवळील गल्लीपर्यंत पुढे पश्चिमेकडे गल्लीने पश्चिमेकडे श्री. पाटील यांचे घरापर्यंत उत्तरेकडे सानेगुरूजी शाळेसमोरील रस्त्याने सारस्वत चौकापर्यंत नंतर पश्चिमेकडे श्रोत्री हॉस्पीटलकडे, नंतर उत्तरेकडे रोडने नेताजी चौकापर्यंत.	
१९		एकूण-८३४४ अ. जा.-७६३ अ. ज.-५५५	१९-अ १९-ब	**स्थळ.**— मिलिंद सोसायटी, आठवडी बाजार परिसर, तहसिल कार्यालय, पोलीस लाईन, आठवडी बाजार, शिंदे नगर, तारपुरा.	१९-अ-ना.मा. प्रवर्ग महिला. १९-ब-सर्वसाधारण खुला.
				उत्तर.— तहसील चौकापासून पूर्वेकडे वणी रोडने मॉर्डन कवेलू भंडार पर्यंत.	
				पूर्व.— मॉर्डन कवेलू भंडार पासून दक्षिणेकडे व नंतर दक्षिण-पूर्वेकडे भोसारोडने रोजी रेफ्रीजरेटर पर्यंत.	
				दक्षिण.— यवतमाळ ग्रामीण भागातील प्रभात नगर मधील श्री. कडू यांचे घरापासून पश्चिमेकडे विदर्भ हाऊसिंग कॉलनीच्या दक्षिण-पश्चिम कोप-यापर्यंत.	
				पश्चिम.— विदर्भ हाऊ. कॉलनीच्या दक्षिण-पूर्व कोप-यापासून जुन्या न. प. हद्दीने उत्तरेकडे व नंतर पूर्वेकडे व पुन्हा उत्तरेकडे मिलिंद हाऊसिंग सोसायटीच्या दक्षिणेकडील येणा-या रोडला मिळेपर्यंत नंतर पश्चिमेकडे मिलिंद सोसायटीचे दक्षिण-पश्चिम कोप-यापर्यंत पुढे उत्तरेकडे मिलिंद सोसायटीचे पश्चिम हद्दीने चापनवाडीतील हनुमान मंदीराकडून	

अनुसूची—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
				येणा-या रोडला मिळेपर्यंत नंतर पश्चिमेकडे हनुमान मंदीरापर्यंत नंतर उत्तरेकडे हरनामसिंग चाळीच्या उत्तर-पूर्व कोप-यापर्यंत नंतर पश्चिमकडे चापनवाडी रोडने उपविभागीय अधिकारी यांचे समोरच्या रोडने गोधनीरोडला मिळेपर्यंत नंतर उत्तरेकडे गोधनी रोडने तहसील चौकापर्यंत.	
२०		एकूण-९७९५ अ. जा.-८०१ अ. ज.-६७६	२०-अ २०-ब	**स्थळ.**– वसीम नगर, भारतनगर, डेहनकर ले-आऊट, मेमन सोसायटी, भोसा गावठाण, सव्वालाखे ले-आऊट (काही भाग), गुल्हाने ले-आऊट, वैभवलक्ष्मी नगर, महाजन ले-आऊट, ईश्वरनगर, संजय गांधी नगर, ताज गोपाल नगर, राधिका ले-आऊट, समतानगर, स्वप्नपूर्ती नगर, व्यंकटेश्वरा नगर, बरवेश्वर नगर, मालानी सोसायटी, बोरले-२, आकाश गृ.नि.स. सोसायटी, आशिर्वाद गृ.नि.स. सोसायटी, सुर्योदय, सो., निलावर ले-आऊट, सुंदर नगर. **उत्तर.**– यवतमाळ अकोलाबाजार रोडवरील चांदसी दवाखान्या समोरून पूर्वेकडे श्री. खान यांचे घरापासून मदरसा समोरून पूर्वेकडे श्री. जुनेखान यांचे घरासमोरून श्री शरीफ खाँन यांचे घरापर्यंत तेथून पूर्वेकडे शेताच्या धु-या-धु-याने शेख जावेद यांचे घरामागील बाजूपर्यंत, तेथून उत्तरेकडे श्री. नसिम खाँन यांचे घरापर्यंत तेथून पूर्वेकडे श्री. अन्सारी यांचे घरापर्यंत तेथून पूर्व-उत्तर कोप-यात श्री. अब्दुल जलील यांचे घरापर्यंत तेथून उत्तरेकडे जफर नगर शाळेच्या गेटपर्यंत तेथून पूर्वेकडे पावर हाऊसच्या वॉलकंम्पाऊंड पर्यंत तेथून पावर हाऊसच्या कंम्पाऊंड वॉलच्या दक्षिणेकडे व नंतर पूर्वेकडे नंतर उत्तरेकडे पारवेकर कॉलेजच्या दक्षिण बाजुच्या कंम्पाऊंड वॉलने पूर्वेकडे पारवेकर कॉलेजच्या रस्त्याने यवतमाळ पांढरकवडा रोड पर्यंत तेथून पूर्वेकडे श्री. एस. एस. जावेद यांचे वर्क्स शॉप पर्यंत. **पूर्व.**– एस. एस. जावेद यांचे वर्क्स शॉप पासून दक्षिणेकडे न.प. हद्दीने दक्षिण कोप-यापर्यंत. **दक्षिण.**– पूर्ण नं. प. हद्द सर्व्हे नं. ३४ पर्यंत. **पश्चिम.**– गोधनी हद्दीपासून उत्तरेकडे श्री. अग्रवाल, श्री. गुल्हाने, श्री. फुलचंद अग्रवाल यांचे अभिन्यास हद्दीने पूर्वेकडे भोसा जि. प. शाळेच्या उत्तर-पश्चिम कोप-या पासून उत्तरेकडे कंम्पाऊंड वॉलने श्री. मोहम्मद कलीम खाँन यांचे घरापर्यंत तेथून उत्तर-पूर्व रस्त्याने श्री. कलीम भाई, श्री. आर. डी. शेख, श्री. याकुब मौलाना यांचे घरासमोरून भोसारोड वरून हैदर अली चौकापर्यंत तेथून पश्चिमेकडे अकोला बाजार यवतमाळ रोडवरील शहनाज काझी यांच्या घरापर्यंत तेथून पश्चिमेकडे	२० अ-ना.मा. प्रवर्ग खुला. २० ब-सर्वसाधारण महिला.

अनुसूची—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
				वाघमारे यांच्या घरासमोरील बालवाडी पर्यंत तेथून उत्तरेकडे अब्दुल साजीद यांच्या घराच्या उत्तर पुर्व कोप-यापर्यंत तेथून रियाज अली यांच्या घराच्या दक्षिण पश्चिम कोप-यापर्यंत तेथून पश्चिमेकडे मधुकर म्हात्रे यांच्या घराच्या दक्षिण पुर्व कोप-या पर्यंत, तेथून उत्तरेकडे अंबर लॉनच्या मागच्या वॉलकंम्पाऊंडने भोसा रोडपर्यंत. तेथून भोसा-यवतमाळ रोडने चांदसी दवाखान्यापर्यंत.	
२१		एकूण-८२१९ अ. जा.-१३५२ अ. ज.-८५१	२१-अ २१-ब	**स्थळ.–** जामनकर नगर, गुरूनानक नगर, आदिवासी सोसायटी, कन्यका सोसायटी, उमरसरा, सुरजनगर, विवेकानंद सोसायटी. **उत्तर.–** संकटविमोचक हनुमान मंदीराचे उत्तर पश्चिम कोप-या पासून पुर्वेकडे शासकीय अध्यापक विद्यालयाच्या उत्तर बाजुने गोधनी रोड पर्यंत तेथून उत्तरेकडे गोधणी रोडने बाजोरीया नगरच्या दक्षिण पश्चिम कोप-या पर्यंत नंतर पुर्वेकडे जुन्या न. पं. हद्दीने विदर्भ हाऊसिंग बोर्डाच्या दक्षिण पुर्व कोप-या पर्यंत नंतर जुन्या न. प. हद्दीने उत्तरेकडे नंतर पुर्वेकडे व उत्तरेकडे जुन्या न. प. हद्दीने पुढे श्री. कडू यांचे घरापासून पुर्वेकडे मधुकर म्हात्रे यांचे घरासमोरून रियाज अली यांच्या दक्षिण-पश्चिम कोप-यापासून पुर्वेकडे अब्दुल साजिद यांच्या घराच्या उत्तर पुर्व कोप-यापर्यंत तेथून दक्षिणेकडे वाघमारे यांच्या घरासमोरील बालवाडी पर्यंत, तेथून पुर्वेकडे शहनाज काझी यांच्या घरासमोरील भोसा रोडला मिळेपर्यंत. **पूर्व.–** भोसा रोडवरील शहनाज काजी यांच्या पासून यवतमाळ घाटंजी रोडने पुर्व दक्षिण दिक्षेने हैदरअली चौकापर्यंत तेथून दक्षिणेकडे श्री. याकूब मौलाना यांचे घरापर्यंत तेथून पुर्व दक्षिण कोप-याने श्री. आर. बी. शेख यांच्या घरापर्यंत पुढे दक्षिणेकडे श्री. कलीमभाई यांचे घरापर्यंत पुढे दक्षिणेकडे श्री. मो. कलीम खान यांचे घरापर्यंत पुढे दक्षिणेकडे वॉल कंम्पाऊंडने जि. प. शाळेपर्यंत तेथून पुढे जि. प. शाळेच्या पश्चिम उत्तर कोप-यापासून दक्षिणेकडे श्री. फुलचंद अग्रवाल, श्री. गुल्हाने यांचे अभिन्यासाच्या हद्दीने न. प. हद्दीपर्यंत. **दक्षिण.–** मौजा भोसाचे सर्व्हे नं. ३७ व उमरस-याचे सर्व्हे नं. ८ चे दक्षिण हद्दीने मौजा उमरसरा शेत सर्व्हे नं. ९ च्या दक्षिण पुर्व हद्दीपर्यंत. **पश्चिम.–** सर्व्हे नं. ९ च्या दक्षिणपुर्व हद्दीपासून उत्तरेकडे जगत मंदीराच्या उत्तर पुर्व कोप-यापासून भिंतीने पुढे तलावाच्या हद्दीने श्री. शेळके यांचे घरापर्यंत पुढे उत्तरेकडे संकट मोचन रोडच्या पश्चिम उत्तर कोप-यापर्यंत.	२१ अ-अनुसूचीत जाती खुला. २१ ब-सर्वसाधारण महिला.

अनुसूची—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
२२		एकूण-९६८५ अ. जा.-२२४९ अ. ज.-१२३९	२२-अ २२-ब	**स्थळ.**– वसंत ले आऊट, साईनाथ सोसायटी, गावठान देशभ्रतार ले-आऊट, निखील नगर, गोवर्धन ले-आऊट, गुरूमाऊली सोसायटी, जुना उमरसरा, रविनगर, शाम सोसायटी, आनंद नगर, **उत्तर.**– चिंतामणी प्रोव्हीजन पासून पुर्वेकडे रस्त्याने श्री. दिगांबर कावळे यांचे घरापर्यंत तेथून उत्तरेकडे श्री. खंडोजी मुनेश्वर यांचे घरापर्यंत तेथून शिवम अपार्टमेंटच्या दक्षिण पश्चिम कोप-या पर्यंत तेथून उत्तरेकडे श्री. मेश्राम यांचे घरासमोरून श्री. ढोके यांचे घरासमोरून सरीता रेसिडेंसीच्या पुर्व बाजुने श्री. चिवाने यांचे घरामागील बाजुपर्यंत श्री. चिवाने यांचे घराचे मागील बाजुने पुर्वेकडे तेथून उत्तरेकडे दिव्या अपार्टमेंट पर्यंत तेथून पुर्वेकडे श्री. विलास भगत यांचे घरापर्यंत तेथून उत्तरेकडे न. प. विभाग कार्यालय उमरसराच्या समोरून पुर्वेकडे श्री. एन. व्ही. निखार यांचे घरापर्यंत तेथून उत्तरेकडे मागासवर्गीय मुलींचे वसतीगृहापासून पुर्वेकडे जुन्या न. प. हद्दीने श्री. कोपूलवार यांचे घरापर्यंत तेथून पुर्वेकडे श्री. किशोर शेलोटे यांचे घरासमोरून संकट मोचन हनुमान मंदिर पर्यंत. **पूर्व.**– हनुमान मंदिरापासून दक्षिणेकडे तलावाच्या हद्दीने पुढे उत्तर पुर्व कोप-याकडून भिंतीने पुढे दक्षिणेकडे व नंतर पुर्वेकडे नंतर दक्षिणेकडे न. प. हद्दीपर्यंत. **दक्षिण.**– मौजा उमरसरा सर्व्हे नं. ९, ११, १२, च्या दक्षिण हद्दीने मौजा वडगांव च्या जुन्या हद्दी पर्यंत. **पश्चिम.**– मौजा वडगावच्या दक्षिण पुर्व कोप-या पासुन उत्तरेकडे श्री. बन्सोड यांचे घराच्या पुढील रस्त्याने श्री. आर. के. खुपसे यांचे घराचे उत्तर पश्चिम कोप-यापर्यंत पुढे पुर्वेकडे श्री. देढे यांच्या घराच्या दक्षिण पुर्व कोप-यापर्यंत पुढे उत्तरेकडे श्री. डाफे यांचे घराच्या उत्तर पश्चिम कोप-यापर्यंत पुढे पुर्वेकडे चिंतामणी गणपती मंदीराचे उत्तर पुर्व कोप-यापर्यंत पुढे उत्तरेकडे चिंतामणी प्रोव्हीजन पर्यंत.	२२ अ-अनुसूचीत जाती खुला. २२ ब-सर्वसाधारण महिला.
२३		एकूण-९४५९ अ. जा.-६९५ अ. ज.-३६१	२३-अ २३-ब	**स्थळ.**– महानंदा नगर(भाग), प्रेरणा नगर(भाग), लक्ष्मीनगर भाग, गिलानीनगर भाग, आनंदनगर भाग, ओम सोसायटी भाग, बालाजी सोसायटी भाग, वैद्य नगर, रामनगर भाग. **उत्तर.**– आर्णीरोडवरील कुमार एंटर प्रायजेसच्या पुर्वेपासून आर्णीरोडने पुर्वेकडे हॉटेल माईच्या पुर्व बाजुच्या रस्त्यापर्यंत. **पूर्व.**– आर्णी रोडवरील हॉटेल माई पासून दक्षिणेकडे गाबडा फिटनेस सेंटर पर्यंत, तेथून पुढे भरणे कॉम्प्लेक्सच्या पश्चिम बाजूपर्यंत पुढे पश्चिमेकडे श्री. फडणवीस यांचे घरापर्यंत पुढे दक्षिणेकडे श्री. चंद्रकांत हांडे यांचे घराचे मागील बाजुने	२३ अ-ना.मा. प्रवर्ग महिला. २३ ब-सर्वसाधारण खुला.

अनुसूची—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
				पुर्वेकडे गणपती मंदिराच्या मागील बाजुने दाते बी.एड. कॉलेजच्या कंम्पाऊंड वॉलच्या रस्त्याने उमरसरा रोडपर्यंत तेथून उत्तरेकडे श्री. विठ्ठलराव शिरभाते यांचे घराचे उत्तर पश्चिम कोप-याने साईप्रसाद अपार्टमेंट विंग ३ च्या उत्तर बाजुने पुढे प्रियदर्शनी अपार्टमेंटच्या उत्तर बाजुने पुढे उत्तरेकडे महालक्ष्मी अपार्टमेंट पर्यंत तेथून पुढे महालक्ष्मी अपार्टमेंटच्या उत्तर बाजुने पुढे दाभेरे यांच्या घराच्या दक्षिण पुर्व कोप-यापर्यंत पुढे उत्तरेकडे पुढे मागासवर्गीय मुलींच्या वस्ती गृहापर्यंत तेथून दक्षिणेकडे श्री. एन.व्ही.विखार यांचे घराचे पुर्व दक्षिण कोप-यापर्यंत तेथून पश्चिमेकडे न. प. यवतमाळचे उमरसरा उपविभागीय कार्यालयासमोरून उमरसरा रोडने दक्षिणेकडे विलास भगत यांचे घराचे दक्षिण कोप-या पर्यंत तेथून पश्चिमेकडे दाते कॉलेज हॉलच्या पुर्व कोप-यापर्यंत तेथून दक्षिणेकडे व नंतर पश्चिमेकडे श्री. चिव्हाने यांचे घराचे मागील बाजूपर्यंत पुढे दक्षिणेकडे शिवम अपार्टमेंटच्या दक्षिण कोप-यापर्यंत पुढे पुर्वेकडे खंडोजी मुनेश्वर यांचे घरासमोरून दिगांबर कावळे यांचे घरापर्यंत.	
				दक्षिण.— श्री. दिगांबर कावळे यांचे घरापासून पश्चिमेकडे चिंतामणी प्रोव्हीजन पर्यंत.	
				पश्चिम.— चिंतामणी प्रोव्हीजन पासून उत्तरेकडे गजभिये यांचे घराचे उत्तर पूर्व कोप-या पर्यंत तेथून पश्चिमेकडे किशोर बोबडे यांचे घरापर्यंत तेथून उत्तरेकडे रवि चौरे यांचे घराचे उत्तर बाजूने नाल्यापासून उत्तरेकडे न.प. यवतमाळचे उमरसरा येथील विभागीय कार्यालयाचे हद्दीने श्री. सुभेदार यांचे घराचे पश्चिम बाजूने दाते कॉलेज रोडवरील श्री. गडीकर यांचे घरापर्यंत पुढे सत्य साई ज्योत मंगल कार्यालयाचे मागील बाजूने जुन्या न. प. हद्दीने आर्णी रोड पर्यंत.	
२४		एकूण-८९०८ अ. जा.-३०९ अ. ज.-३०६	२४-अ २४-ब	**स्थळ.**— श्रद्धा नगर, भाग्योदय सोसायटी, राधाकृष्ण नगरी, हनुमान नगर, महादेव नगर, बालाजी सोसायटी, (भाग), अष्टविनायक कॉलनी, कृषीनगर, ओम सोसायटी.	२४ अ-ना. मा. प्रवर्ग महिला. २४ ब-सर्वसाधारण खुला.
				उत्तर.— आर्णी रोडने पुर्वेकडे शोभादेवी मंगल कार्यालया-समोरील आर्णी यवतमाळ रोडने पुर्वेकडे कुमार एंटरप्रायजेस पर्यंत.	
				पूर्व.— आर्णी रोडवरील कुमार एंटरप्रायजेस पासून दक्षिण पुर्व जुन्या न.प. हद्दीने सत्यसाईज्योत मंगलकार्यालयाचे मागील बाजुने दाते कॉलेज रोडवरील श्री. गडीकर यांचे घरापर्यंत पुढे श्री. गढीकर यांचे घरापासून दक्षिणेकडे जुन्या न. प. हद्दीने श्री. सुभेदार यांचे घराचे पुर्व बाजुने पुढे	

अनुसूची—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
				वडगावं हद्दीने राम मंदीराच्या नाल्याने वानखडे यांचे घरासमोरील श्री. किशोर बोबडे यांचे घरापर्यंत पुढे पुर्वेकडे श्री. किशोर बोबडे यांचे घरापासून श्री. गजभिये यांचे घरापर्यंत पुढे दक्षिणेकडे नरेंद्र नगरातील चिंतामणी गणपती मंदिरापर्यंत.	
				दक्षिण.— चिंतामणी गणपती मंदिरापासून पश्चिमेकडे श्री. डाफे यांचे घराचे दक्षिण पश्चिम कोप-यापर्यंत तेथून पुढे उत्तरे श्री. तळेगांवकर यांचे घरापर्यंत नंतर पुढे पश्चिम उत्तर कोप-यात श्री. प्रविण येंडे यांच्या घरापर्यंत पुढे उत्तरेकडे श्री. गुल्हाने यांचे घराचे उत्तर पुर्व कोप-यापर्यंत पुढे रस्त्याने पश्चिमेकडे श्री. मानकर यांचे घराचे मागील रस्त्यापर्यंत पुढे उत्तरेकडे व्यायाम शाळेपर्यंत पुढे पश्चिमेकडे रस्त्याने श्री. बढीये यांचे घराच्या दक्षिण पश्चिम कोप-यापर्यंत.	
				पश्चिम.— श्री. बढीये यांचे घरापासून रस्त्याने आर्णी रोडवरील मॅक मोटर्स समोरून उत्तरेकडे आर्णी रोडने शोभादेवी मंगल कार्यालयापर्यंत.	
२५		एकूण-८६३९ अ. जा.-७९८ अ. ज.-४६४	२५-अ २५-ब	**स्थळ.**— भारती नगर, दर्डा नगर, प्राध्यापक कॉलनी, कोल्हे ले-आऊट, पुष्प कुंज सोसायटी, प्रभात सोसायटी, दिपनगर, सिंघानीया ले-आऊट, श्री. कृष्णनगर, अंजनेय सोसायटी, भुमीअभीलेख सोसायटी, एकवीरा नगरी, एकलव्य नगर, श्रीराज नगर,	२५ अ-ना. मा. प्रवर्ग खुला. २५ ब-सर्वसाधारण महिला.
				उत्तर.— दारव्हा रोडवरील कोल्हे सभागृहाच्या समोरील रोडने पुर्वेकडे दारव्हा रोडवरील भारती कॉम्प्लेक्सचे जवळील दर्डा नगर चौक पर्यंत.	
				पूर्व.— दारव्हा रोडवरील भारती कॉम्प्लेक्स समोरील दर्डा नगर चौकापासून दक्षिणेकडे श्री. डहाके यांचे घरापर्यंत तेथून पुर्वेकडे श्री. डाखरे यांच्या घराच्या मागील बाजुने श्री. कोंगरे यांचे घराचे मागील बाजूने विश्वकर्मा मंदीरा पुढे सार्वजनिक शौचालय पासून पुर्वेकडे श्री. वारेकर व तेथून दक्षिणेकडे श्री. निचडे यांचे घरापासून दक्षिणेकडील श्री. गाडगे यांचे घराचे मागील बाजू पर्यंत.	
				दक्षिण.— श्री. गाडगे यांचे घराचे दक्षिण पुर्व कोप-यापासून पश्चिमेकडे नाल्या पर्यंत तेथून नाल्याने दक्षिण पश्चिम कोप-याजवळील श्री. भगत यांचे घरामागील नाल्याने श्री. शिरसाट यांचे घरापासून उत्तरेकडे श्री. खारकर यांचे घरापर्यंत तेथून पश्चिमेकडे हनुमान मंदीर रस्त्याने तेजस्विनी कन्या होस्टेल पर्यंत तेथून उत्तरेकडे श्री. भुरे यांचे घरापर्यंत तेथून पश्चिमेकडे मनोहर प्रोव्हीजन पर्यंत तेथून	

अनुसूची—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
				दक्षिणेकडे नाल्याचे वर श्री. शेंडे यांचे घरापर्यंत तेथून पश्चिमेकडे श्री. गुल्हाने यांचे घरापर्यंत नाल्याने पश्चिमेकडे श्री. कृपा नगराच्या खुल्या जागेपर्यंत तेथून उत्तरेकडे श्री. शिरभाते यांचे घरापर्यंत तेथून पश्चिमेकडे श्री. रानडे यांचे घरापर्यंत तेथून उत्तरेकडे री. आडे यांचे घरापर्यंत. **पश्चिम.**– श्री. मेघे यांचे घरापासून उत्तरेकडे वडगांव ग्रामपंचायतीच्या हद्दीने उत्तरेकडे श्री. गुल्हाने यांच्या शेताच्या दक्षिण-पूर्व कोप-यापर्यंत तेथून पुर्वेकडे श्री. राऊत यांचे घरापर्यंत तेथून उत्तरेकडे श्री. जांगीड यांचे घरापर्यंत तेथून पुर्वेकडे मधुरा ब्युटी पार्लर पर्यंत तेथून उत्तरेकडे कोल्हे सभागृह रस्त्याने उत्तरेकडे कोल्हे सभागृह पर्यंत तेथून पश्चिमेकडे श्री. सुभाष चौधरी यांचे घरापर्यंत तेथून दक्षिणेकडे श्री. मेंढुले यांचे घरापर्यंत तेथून दक्षिणेकडे विदर्भ प्रिमीयम ले-आऊट कडून पश्चिमेकडे श्री. मेघे यांचे घरापर्यंत.	
२६		एकूण-८४८५, अ. जा.-९५४, अ. ज.-६०७.	२६ अ २६ ब	**स्थळ.**– पोलीस मित्र सोसायटी, बसवेश्वर नगर, पद्मावती पार्क, सुयोग नगर, दत्तात्रय नगर. **उत्तर.**– लोहारा चौकापासून दारव्हा रोडने पुर्वेकडे कोल्हे सभागृहापर्यंत. **पूर्व.**– कोल्हे सभागृहापासून दक्षिणेकडे रोडने मधुरा ब्युटी पार्लर पर्यंत तेथून पश्चिमेकडे श्री. राऊत यांचे घरापर्यंत. **दक्षिण.**– श्री. राऊत यांचे घरापासून पश्चिमेकडे नाल्याने जुन्या लोहा-याच्या हद्दीपर्यंत. **पश्चिम.**– नाला व एम.आय.डी.सी.ची. पूर्व हद्द यांचे जंक्शन पासून एम.आय.डी.सी. च्या पूर्व हद्दीने उत्तरेकडे दारव्हा रोडला मिळेपर्यंत.	२६ अ-ना.मा.प्रवर्ग खुला. २६ ब-सर्वसाधारण महिला.
२७		एकूण-९०९८, अ. जा.-९१७, अ. ज.-१०९४.	२७ अ २७ ब	**स्थळ.**– पुष्पकुंज सोसायटी, सत्यनारायण ले-आऊट, नरसिंह नगर, रामनगरी, धनश्री नगर, वडगांव गावठान, एकता नगर, एकविरा नगर. **उत्तर.**– शांतीनाथ ट्रेडर्स पासून पश्चिमेकडे श्री. गाडगे यांचे घरामागील नाल्यापर्यंत, नाल्याने दक्षिण-पश्चिम कोप-याजवळील श्री. भगत यांचे घरामागील नाल्याने श्री. शिरसाट यांचे घरापासून उत्तरेकडे श्री. विष्णू खारकर यांचे घरापर्यंत तेथून पश्चिमेकडे हनुमान मंदिर रस्त्याने तेजस्विनी होस्टेल पर्यंत तेथून उत्तरेकडे श्री. भुरे यांचे घरापर्यंत तेथून पश्चिमेकडे मनोहर प्रोव्हीजन पर्यंत तेथून दक्षिणकडे नाल्याचे वर श्री. शेंडे यांचे घरापर्यंत तेथून	२७ अ-अनुसूचीत जमाती खुला. २७ ब-सर्वसाधारण महिला.

अनुसूची—चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
				पश्चिमेकडे श्री. गुल्हाने यांचे घरापर्यंत नाल्याने पश्चिमेकडे कृष्ण मंदिराचे खुल्याजागे पर्यंत तेथून उत्तरेकडे श्री. शिरभाते यांचे घरापर्यंत तेथून पश्चिमेकडे श्री. रानडे यांचे घरापर्यंत तेथून उत्तरेकडे श्री. आडे यांचे घरापर्यंत तेथून पश्चिमेकडे श्री. सुभाष चौधरी यांचे घरापर्यंत तेथून दक्षिणेकडे श्री. मेंढुले यांचे घरापर्यंत तेथून दक्षिणेकडे विदर्भ प्रिमीयम ले-आऊट मधुन पश्चिमेकडे श्री. मेघे यांचे घरापर्यंत.	
				पूर्व.– शांतीनाथ ट्रेडर्स पासून दक्षिण-पश्चिमेला मॅक मोटर्स पर्यंत.	
				दक्षिण.– मॅक मोटर्स पासून आर्णी रोडने वाघाडी मंदिराचे पुलापर्यंत म्हणजेच वडगांव हद्दीपर्यंत.	
				पश्चिम.– श्री. मेघे यांचे घरापासून नाल्याने वडगांवच्या जुन्या हद्दीने नाल्याने दक्षिणेकडून पश्चिमेकडे नंतर दक्षिणेकडून पश्चिमेकडे नाल्याने पुलापर्यंत.	
२८		एकूण-८४२३, अ. जा.-९४८, अ. ज.-९२७,	२८ अ २८ ब	**स्थळ.**– समनानी नगर, छत्रपतीनगर, भाग्योदय कॉलनी, विकास कॉलनी, रामकृष्णनगर, सारंग सोसायटी, राधाकृष्णनगर, श्रद्धनगर, गोविंदनगर, तुलसीनगर, पृथ्वीराज नगर, बायपास.	२८ अ-अनुसूचीत जमाती खुला. २८ ब-सर्वसाधारण महिला.
				उत्तर.– आर्णी रोडवरील मॅक मोटर्स पासून दक्षिणेकडे श्री. बढीये यांचे घरापर्यंत तेथून पुर्वेकडे व्यायाम शाळेच्या दक्षिण-पूर्व कोप-यापर्यंत तेथून दक्षिणेकडे श्री. पुरी यांचे घरापर्यंत तेथून पुर्वेकडे श्री. मानकर यांचे घरामागील बाजुने श्री. गुल्हाने यांचे घरापर्यंत.	
				पूर्व.– श्री. गुल्हाने यांचे घरापासून दक्षिणेकडे श्री. प्रविण येंडे यांचे घरापर्यंत तेथून पूर्व-दक्षिण कोप-यात श्री. तळेगांवकर यांचे घरापर्यंत तेथून दक्षिणेकडे श्री. देढे यांचे घरापासून दक्षिणेकडे वडगांव हद्दिने आर्णी-नागपूर बायपास रोडने वडगांव हद्द संपेपर्यंत.	
				दक्षिण.– आर्णी-नागपूर बायपास सर्व्हे नं. ४६ च्या दक्षिण-पूर्व कोप-यापर्यंत शेत सर्व्हे नं. ४६ च्या दक्षिण-पूर्व कोप-यापासून पश्चिमेकडे वडगांव येथील सर्व्हे नं. ५१, ५२, ५३, ५६, ५७ च्या दक्षिण हद्दीने आर्णी रोडला मिळेपर्यंत.	
				पश्चिम.– मॅक मोटर्स पासून आर्णी रोडने पश्चिमेकडे सरळ जुना वडगांवच्या सर्व्हे नं. ५६ गुरूद्वारा पर्यंत.	

सचिन्द्र प्रताप सिंह,
जिल्हाधिकारी,
यवतमाळ.

यवतमाळ :
दिनांक १६ ऑगस्ट २०१६.

भाग १-अ (असा.) (अ.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. ८६.

BY COLLECTOR

In exercise of powers the conferred on him, by Order No. SEC-MMC-2005-CR-17-D-5, dated 3rd May 2005 of the State Election Commissioner, Maharashtra, the Collector of Yavatmal District proposes to make the following draft order under sub-section (*1*) of the Section 10 of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 to fix for the **Yavatmal** Municipal Council area shall be divided and to specify the wards reserved for Scheduled Castes, Scheduled Tribes, Backward Class of Citizens and Women (including Women belonging to the Scheduled Castes, Scheduled Tribes, Backward Class of Citizens) as the case may be as shown in the Schedule to this order No. AK-MCA-WS-753-2016, dated 29th June 2016 was published as required by the provision to sub-section *(1)* of Section 10 of the said Act for the information of all the residents of the Yavatmal Municipal Council. After carefully considering the objection received by me in respect of the said draft Order, I, the Collector of Yavatmal District in exercise of the powers conferred on me by sub-section *(1)* of Section 10 of the said Act, hereby make the following order namely,—

ORDER

No.. AK-MCA-WS-1653-2016.—

Whereas, the Regional Director of Municipal Administration, Amravati Division, Amravati by his Order No. RDMA-RRM-296-2016, dated 09-08-2016 issued under sub-section *(2)* of Section 9 of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 has granted permission to final ward formation & fixed Member's of Yavatmal Municipal Council to be elected and the number of seats to be reserved for the Scheduled Castes, Scheduled Tribes, Backward Class of Citizens and Women (including the number of seats reserved for Women belonging to the Scheduled Castes, Scheduled Tribes and Backward Class of Citizens) as shown below :—

(1)	The number of Councillors to be elected	56
(2)	The number of Seats to be reserved,—	
	(a) for the Scheduled Castes	09
	(b) for the Scheduled Tribes	04
	(c) for the Backward Class of Citizens	15
